**<u>ठळक बातम्या</u>**

- अदानी लाच प्रकरण आणि इतर मुद्द्यांवरुन विरोधी पक्षांच्या गदारोळानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आजही दिवसभरासाठी तहकूब
- झारखंडचे मुख्यमंत्री म्हणून हेमंत सोरेन यांचा शपथविधी
- महाराष्ट्रातल्या सरकारस्थापनेविषयी आज रात्री नवी दिल्लीत भाजपा पक्षनेतृत्वासोबत महायुतीच्या घटक पक्षांची बैठक

  **आणि**

- आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेतल्या आरोग्य सुविधांचा समावेश राज्य कर्मचारी  विमा महामंडळाच्या सुरक्षा कवचातही होणार

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आज सलग तिसऱ्या दिवशी गदारोळामुळे दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं.

लोकसभेचं कामकाज सुरू झाल्यावर अदानी लाच प्रकरणासह इतर मुद्यांवरून विरोधी पक्षांच्या सदस्यांनी  गदारोळ केला. सभागृहाच्या हौद्यात उतरून सदस्यांनी घोषणाबाजी केली. विरोधी पक्ष देशाच्या हिताशी संबंधित नसलेले मुद्दे उचलत आहे, असं म्हणत लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी, घोषणाबाजी करणाऱ्या सदस्यांना त्यांच्या जागेवर परतायला सांगितलं, आणि प्रश्नोत्तराचा तास पुकारला.  मात्र गदारोळ चालूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं.

राज्यसभेचं कामकाज सुरू झाल्यावर काँग्रेस खासदार प्रमोद तिवारी यांनी अदानी समूह लाच प्रकरणी चर्चा घेण्याची विनंती केली. मात्र, राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला.

दरम्यान, वक्फ सुधारणा विधेयक २०२४ वरचा अहवाल सादर करण्याची मुदत २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी ठेवला होता, तो लोकसभेनं संमत केला.

<><><><>

विरोधी पक्षांनी संसदेत गदारोळ केल्याबद्दल संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी टीका केली आहे. लोकसभेचे सभापती आणि राज्यसभा अध्यक्ष यांनी परवानगी दिलेल्या विषयावर चर्चा करायला सरकार तयार आहे, असं त्यांनी संसदेच्या आवारात बातमीदारांना सांगितलं.

संसदेमधे सरकारी कामकाजाबरोबरच जनतेशी संबंधित विविध मुद्यांवर चर्चा होणं अपेक्षित आहे असं काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी म्हटलं आहे. संसदेच्या आवारात प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते. लोकशाहीचा अर्थ सर्वांना सोबत घेणं असा असल्याचं ते म्हणाले.

<><><><>

केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघातून पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वड्रा यांनी आज लोकसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. तसंच नांदेड लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार रविंद्र चव्हाण यांनी लोकसभेचे सदस्य म्हणून शपथ घेतली. चव्हाण यांनी मराठीतून शपथ घेतली.

<><><><>

नवी मुंबई विमानतळाच्या नामांतराचा निर्णय अजून केंद्र सरकारनं घेतलेला नाही, अशी माहिती केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज

लोकसभेत लेखी उत्तरात दिली. नवी मुंबई विमानतळाला 'लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ' असं नाव देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं पाठवला आहे.

<><><><><>

झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन यांनी आज चौथ्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. राज्यपाल संतोष गंगवार यांनी आज रांची इथल्या मोरहाबादी मैदानावर झालेल्या कार्यक्रमात त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली.

यावेळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, ज्येष्ठ आरजेडी नेते तेजस्वी यादव आणि कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस दीपंकर भट्टाचार्य यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

विधानसभेत विश्वासदर्शक ठराव जिंकल्यानंतर मुख्यमंत्री हेमंत सोरेन आपल्या मंत्रिमंडळाची स्थापना करतील. विश्वासदर्शक ठरावानंतर मंत्र्यांचा शपथविधी होणार आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात सरकरस्थापना आणि मुख्यमंत्री कोण होणार याविषयी निर्णय घेण्यासंदर्भात महायुतीच्या घटक पक्षांच्या नेत्यांची आज रात्री  नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबरोबर संयुक्त बैठक होणार असून त्यानंतर सरकार स्थापनेबद्दल चित्र स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

<><><><><>

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत येणाऱ्या आरोग्य सुविधांचा समावेश राज्य कर्मचारी  विमा महामंडळाच्या सुरक्षा कवचात करून

त्याची व्याप्ती वाढवण्यात येणार असल्याचं कामगार आणि रोजगार मंत्रालयाने आज आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

या योजनेचा लाभ १४ कोटींपेक्षा जास्त लाभार्थ्यांना होईल, देशभरातल्या कर्मचाऱ्यांना चांगली आरोग्य सुविधा मिळेल, तसंच प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत जोडलेल्या देशभरातल्या तीस हजारपेक्षा जास्त रुग्णालयांमधल्या सेवांचा लाभही त्यांना मिळेल असं या पत्रकात म्हटलंय.

उपचार खर्चावर कोणतीही मर्यादा नसेल, तसंच देशातल्या धर्मादाय रुग्णालयांमध्येही या योजनेच्या लाभार्थ्यांना सेवा दिली जाईल, असंही यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

लखनौ इथे सुरू असलेल्या सैद मौदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरी प्रकारात भारताच्या पी. व्ही. सिंधू, उन्नती हुडा आणि श्रीयांशी वालिशेट्टी यांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. तिने भारताच्या इरा शर्मा हिचा २१-१०, १२-२१, २१-१५ असा पराभव केला. याच प्रकाराच्या दुसऱ्या सामन्यात भारताच्या उन्नती हुडा हिने पोर्नपिचा चोईकीवोंग हिचा २१-१८, २२-२० असा सरळ गेममध्ये पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. तर श्रीयांशी वालिशेट्टी हिने मालविका बनसोड हिचा २१-१२, २१-१५ असा पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

या स्पर्धेच्या पुरुष एकेरी प्रकारात भारताच्या मीराबा लुवांग मैसराम आणि आयुष शेट्टी यांनीही उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. मीराबा याने सहाव्या मानांकित आयर्लंडच्या नट गुयेन याचा २१-१५, २१-१३ असा पराभव केला. तर आयुष याने मलेशियाच्या जस्टिन होह याला २१-१२, २१-१९ असं नमवलं. तर

लक्ष्य सेन यानेही इस्त्रायलच्या डॅनिल डुबोवेंको याचा २१-१४, २१-१३ असा पराभव केला.

महिलांच्या दुहेरी प्रकारात तनिषा क्रास्टो आणि अश्विनी पोनप्पा या भारतीय जोडीने चिनी तैपेईच्या चेन सु यू आणि यी एन हसीह या जोडीचा २१-१९, ८-२१, २१-१२ असा पराभव करत स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली.

<><><><><>

महात्मा जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथिनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जोतिबा फुले यांना आदरांजली वाहणारे संदेश समाजमाध्यमावर लिहीले आहेत. जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या विचार - कार्यावर आधारित विविध कार्यक्रम विविध संस्था संघटनांतर्फे राज्यात सर्वत्र होत आहेत.

<><><><><>

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे दिला जाणारा महात्मा फुले समता पुरस्कार आज दिग्दर्शक नागराज मंजुळे यांना प्रदान करण्यात आला. समता परिषदेचे अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या अध्यतेखाली पुण्यात फुले वाड्यात हा कार्यक्रम झाला. आज समतेचा विचार पुढे घेऊन जायची गरज आहे, अशी भावना यावेळी नागराज मंजुळे यांनी व्यक्त केली.

<><><><><>

व्यवसाय सुलभतेसाठी केंद्रसरकार विविध उपाययोजना करीत असून राष्ट्रीय एक खिडकी योजनेचा उद्योगक्षेत्राला मोठ्या प्रमाणावर फायदा झाला असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयुष गोयल यांनी आज सांगितलं. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज /भारतीय उद्योग महासंघ या संघटनेतर्फे सुरु करण्यात

आलेल्या ईझ ऑफ डुईंग बिझनेस अँड रेग्युलेटरी अफेअर्स पोर्टलचं उद्धाटन आज गोयल यांच्या नवी दिल्ली इथं हस्ते झालं. त्यावेळ ते बोलत होते.

व्यवसायसुलभतेसाठी केंद्रसरकार आणि सीआयआय तर्फे उपलब्ध सुविधांची माहिती या पोर्टलवर मिळू शकेल. जनविश्वास टू पॉईंट झीरो या विधेयकाद्वारे ३०० पेक्षा जास्त कायदे शिथिल करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

सर्वच क्षेत्रातल्या चौफेर प्रगतीमुळे भारत आंतरराष्ट्रीय व्यापार, संशोधन आणि गुंतवणुकीसाठी जागतिक पातळीवर आकर्षण ठरला असल्याचं गोयल यांनी वार्ताहर परिषदेत बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणूक प्रक्रियेत वाढलेलं साडेसात टक्के मतदान कसं वाढलं याचं निवडणूक आयोगानं उत्तर द्यावं, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत केली.

आम्हाला मतदान प्रक्रियाच संशयास्पद वाटत असून लोकांचीही अशीच भावना असल्याचं ते म्हणाले. राज्यात तब्बल ७६ लाख मतं वाढली असून संध्याकाळी साडेपाच ते साडेअकरा या वेळेत कुठे कुठे मतदान सुरु होतं याचे पुरावे आयोगानं द्यावेत असंही ते म्हणाले.